# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 28/12/2023 (गुरूवार) सकाळ

## मोटरसायकल चोरी करणारे आरोपी पोलीस स्टेशन सावनेर यांच्या जाळयात

फिर्यादी नामे— प्रितम केशव पारधी, रा. डब्ल्यू सी एल कॉलनी वाघोडा ता. सावनेर हा दिनांक २७/१२/२०२३ रोजी सायंकाळी १७.०० वा. सुमा. WCL स्टेडियम वाघोडा येथे आपली स्वत:ची एक हिरो होण्डा पॅशन प्लॅस मो.सा. क्र: MH 40 C 1085 बाहेर ऊभी करून रनिंग प्रॅक्टिस करीता मैदानात गेला असता रनिंग प्रॅक्टिस करून घरी जाण्याकरीता परत आपली मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी आला असता त्याला त्याची मोटरसायकल ही ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही. आजु बाजु परीसरात शोधले असता मिळून न आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

पोलीस स्टेशन सावनेर येथील डी. बी. पथक यांनी मोटार सायकल चोरी करणारे गुन्हेगारांचा शोध घेवुन आरोपी नामे— १) नकुल हजारी पहाडे, वय २५ वर्ष राह. शक्ती नगर झोपडपट्टी आगेवाडा ता. सावनेर (२) सुनील रामसजीवन केसकर, वय ३९ वर्ष राह. बंदर कॉलोनी पोस्ट, खडसंगी ता. चिमुर जि. चंद्रपुर ह. मु. बजाज कॉलोनी वाघोडा ता. सावनेर जि. नागपुर यांना अटक करून गुन्हयातील चोरीस गेलेली एक हिरो होण्डा पॅशन प्लस मो.सा.क्र: MH 40 C 1085 आरोपीतां कडून जप्त करण्यात आली असुन गुन्हा उघडकीस करण्यात आला असुन वरील दोन्ही आरोपीतांचा पी सी आर घेवुन आणखी चोरीचे गुन्हे उघडकीस करण्याचा प्रयत्न करीत आहे.

सदरची कार्यवाही ही सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री. अनिल म्हस्के सा. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, सहायक पोलीस निरीक्षक शरद भस्मे, सहायक फौजदार गणेश रॉय, पोलीस हवालदार रवि मेश्राम, पोलीस अंमलदार दाउद मोहम्मद यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर